


रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २६
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, १२ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

नैसर्गिक आपत्तीबाधितांना निकषाच्या दुपटीने मदत/२
सोशल मीडियातून मैत्री करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार/६
घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत पनवेल मनपातर्फे मॅरेथॉन/८

# माथेरानला मुंबईच्या जवळ आणणार

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही | निसर्गरम्य वातावरणामध्ये ट्रेक उत्साहात






**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानला मुंबईच्या जवळ आणण्यासाठी पनवेल हा मुख्य दुवा आहे. माथेरान हे पनवेलपासून हाकेच्या अंतरावर आहे. पर्यटकांना याचा फायदा होऊन लवकरात लवकर पनवेलहून माथेरानला कसे पोहचता येईल याकडे प्रामुख्याने लक्ष देणार आहे. यामुळे पनवेलमधील काही गावांचा पर्यटन विकाससुद्धा करता येईल, असे पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे. ते ट्रेक करत रविवारी (दि. ११) माथेरानमध्ये आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

भाजप युवा मोर्चाच्या माध्यमातून १८ वर्षाच्या युवकापासून ते ६९ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांना पर्यावरण ट्रेकचा आनंद देत आमदार प्रशांत ठाकूर माथेरानमध्ये दाखल झाले. त्यांच्यासमवेत भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, निसर्ग मित्र संस्थेचे प्रतिनिधी होते. पनवेल तालुक्यातील धोदानी ते माथेरान हे डोंगराळ अंतर पार करत १५० लोकांचा चमू माथेरान येथील सनसेट पॉइंटवर दाखल झाला.

माथेरानमध्ये भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव आदींनी सर्वांचे स्वागत केले.

पनवेलपासून धोदानीपर्यंत पक्का रस्ता असून महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाची एसटी सेवाही सुरू आहे. धोदानी गावापासून माथेरान हे साडेचार किलोमीटर असून हा रस्ता जर झाला, तर येथील काही गावांचा पर्यटन विकास होऊन आर्थिक प्रगती होईल याचा सारासार विचार करून पनवेल-माथेरान रस्ता तयार करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले. **(पान २ वर..)**

# १०० कोटी जमा करून जयंत पाटलांकडे द्यायचे टार्गेट दिले होते

## माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंह यांचा आरोप



**मुंबई : प्रतिनिधी**

अँटेलिया प्रकरणाच्या दबावामुळे मी आता बोलतोय असे नाही, तर माझ्यावर अनिल देशमुख यांनी बिनबुडाचे आरोप केलेत त्याचे खंडन करण्यासाठी मी बोलतोय. मुंबईमधून १०० कोटी रुपये जमा करून देण्याचे टार्गेट होते आणि हे सर्व पैसे मंत्री जयंत पाटील यांच्याकडे जमा करायला लागतील, असे तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मला सांगितले होते, असा धक्कादायक आरोप मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंह यांनी केला आहे.

माझ्याकडे माणूस पाठवून मला ब्लॅकमेलिंग करण्यात आल्याचे आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर केला. यानंतर अँटिलिया खटल्यातील आरोपी सचिन वाझेने देशमुखांवर आरोप केले. आता परमवीर सिंह यांनीदेखील देशमुखांवर गंभीर आरोप केले आहेत. पोलीस विभागावर दबाव तंत्र टाकणारे महाविकास आघाडीचे गलिच्छ सरकार होते. असे मी माझ्या ३४ वर्षाच्या सर्व्हिसमध्ये पाहिले नाही आणि पुढे पाहणार नाही, असे परमवीर सिंह एका मुलाखतीत म्हणाले.

अनिल देशमुख यांच्या मुलाने माझी पाया पडून माफी मागितली होती. माझ्याशी पंगा घेतला तर मीही तयार आहे. अनिल देशमुख निवडणुकीच्या तोंडावर असे माझ्यावर आरोप का करीत आहेत? महाविकास आघाडीतील नेत्यांनी त्यांना समजवावे. मी देशमुख यांचे १० ते २० टक्केच प्रकरण बाहेर काढले आहे. वेळ आल्यावर सर्वच बाहेर काढेन, असा इशारा परमवीर सिंह यांनी या वेळी दिला.

# राज ठाकरे यांच्याकडून मनसैनिकांना शांततेचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**



शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी बीडमध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा ताफा अडवून त्यांच्या वाहनासमोर सुपाऱ्या फेकल्या होत्या. यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांनी शनिवारी रात्री उद्धव ठाकरे हे ठाण्यात येत जात असताना त्यांच्या ताफ्यावर नारळफेक केली. त्यानंतर राज ठाकरे यांनी मनसैनिकांना शांततेचे आवाहन केले आहे.

राज ठाकरे यांनी एक्स अकाउंटवर पोस्ट करत म्हटले की, जशास तसं नाही तर जशास दुप्पट असं उत्तर देणं म्हणजे काय असतं याची चुणूक काल तुम्ही दाखवली, ती पुरेशी आहे. त्यामुळे तुम्ही सगळं हे थांबवा असं माझं, माझ्या महाराष्ट्र सैनिकांना आवाहन आहे.

महाराष्ट्राची राजकीय परिपक्वता, राजकीय मतभेद झाले तरी मनभेद होऊ द्यायचे नाहीत ही संस्कृती किमान आपल्याकडून पुसली जाणार नाही हे आपण पाहूया, पण हे करताना तुमच्या नावावर खपवून, परस्पर पक्षाला बदनाम करण्याचे प्रकार कुठे घडत नाहीयेत ना याकडेही लक्ष ठेवा. महाराष्ट्रात शांतता नांदेल, इथल्या निवडणुका शांततेत पार पडतील हे किमान आपण तरी नक्की पाहूया आणि तरीही नतद्रष्ट सुधारणार नसतील, तर त्यांचं काय करायचं ते नंतर पाहू,' असेही राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

# आमदार महेश बालदी यांचे बूथ अभियान

## मतदारसंघातील प्रत्येक बूथवर प्रत्यक्ष भेटीस सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी हे प्रत्येक बूथवर जाऊन १ अधिक २५ असे कार्यकर्ते व नागरिक यांची भेट घेऊन आपल्या विभागामध्ये २०१९पासून आजपर्यंत आमदारकीच्या कार्यकाळात कोणकोणती विकासकामे झाली याचा आढावा घेत आहेत. या बूथ अभियानाला शनिवारी (दि. १०) पळस्पे जिल्हा परिषद विभागातून प्रारंभ झाला.

आमदार महेश बालदी यांनी पळस्पे जि.प. गटातील कोळखे, पारपुंड, पेठ, डेरवली येथे जाऊन नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्यासमवेत भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील यांच्यासह सुनील गवंडी, रवी शेळके, सुरेश पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वांचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले.



आमच्या विभागात याआधी विकासकामे झाली नव्हती एवढी या पाच वर्षांत झाली. शिवाय आमदार महेश बालदी स्वतः या विकासकामांचा आढावा घेतात. यामुळे आम्ही सोसायटीमधील रहिवासी समाधानी आहोत, असे डेरवली कॉलनीतील नागरिकांनी बूथ भेट अभियानादरम्यान सांगितले.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत किती महिलांनी अर्ज भरले आणि किती जण पात्र झाल्या याचाही आढावा घेतला. ज्या महिलांचे अर्ज भरायचे राहिले असतील त्यांनी आमच्या कार्यालयामार्फत लवकरात लवकर या योजनेचे अर्ज भरून घ्यावेत, असे आवाहनही आमदारमहोदयांनी उपस्थित महिलांना केले.

## निवडक

### रेल्वेगाडीत आगीची अफवा; उड्या टाकल्याने प्रवासी जखमी




**लखनऊ :** अमृतसरहून हावडाच्या दिशेने जात असलेल्या पंजाब मेल एक्स्प्रेसला आग लागल्याची अफवा पसरल्यानंतर प्रवाशांनी चक्क चालत्या रेल्वेगाडीतून उड्या मारल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी (दि. ११) उत्तर प्रदेशातील बिलपूर ते कटरा स्टेशनदरम्यान घडला. या वेळी चेंगराचेंगरीही झाली. या घटनेत २०हून अधिक प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी सहा प्रवाशांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. जखमींना शाहजहांपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे.

# हमरापूरच्या गणेशमूर्ती व्यवसायाला मिळणार समूह विकासाची जोड

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हमरापूर येथील गणेशमूर्ती व्यवसायाला आता समूह विकासाची जोड मिळणार आहे. केंद्र सरकारच्या सुक्ष्म आणि लघु समूह विकास कार्यक्रमांर्तगत केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने हा उपक्रम राबविला जाणार आहे. यासाठी श्री मोरया गणपती आयडॉल फाऊंडेशन या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. जागा निश्चितीही झाली आहे. साडेचार कोटींचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला असून तो मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी कंपनीमधील भागीदारांनी १० टक्के निधी उभारचा आहे, तर



उर्वरित ९० टक्के निधी केंद्र आणि राज्य सरकार देणार आहे.

हमरापूर येथील गणेशमूर्ती व्यवसायाचे विस्कळीत स्वरूप दूर करून त्याचा एकत्रित विकास करणे हा समूह विकास प्रकल्पामागचा हेतू आहे. हमरापूर, जोहे परिसरातील साडेतीनशेहून अधिक गणेशमूर्तीकार व्यावसायिक एकत्र आले असून

> **हमरापूर गावात अशा प्रकारचे सुविधा केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. यातून गावातील लहान कारागिरांनाही उद्योगवाढीसाठी मदत होईल.**
> **-गु.श. हरळ्या, महाव्यवस्थापक, रायगड जिल्हा उद्योग केंद्र**

त्यांनी कंपनीची स्थापना केली आहे. याच परिसरातील जागा भाडेतत्वावर घेऊन या ठिकाणी प्रकल्पाची उभारणी केली जाणार आहे. **(पान २ वर..)**



**पनवेल : राजापूर (जि. रत्नागिरी) येथील आबासाहेब मराठे कॉलेजचे प्रा. संजय मेस्त्री यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रविवारी भेट घेत शैक्षणिक, सामाजिक, विषयांवर चर्चा केली. या वेळी ग्रंथपाल तृप्ती आंब्रे, उद्योजक उद्धव पवार आदी उपस्थित होते.**

# कर्नाळा अभयारण्य, किल्ल्याची अमेरिकन दूतावासालाही भुरळ

## मायकल हँकी रमले निसर्गाच्या सान्निध्यात

**पनवेल : वार्ताहर**


अमेरिकन दुतावास (नेशन)चे मायकल हँकी यांना पनवेल तालुक्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य आणि किल्ला यांची भुरळ पडली असून त्यांनी रविवारी (दि. ११) सकाळी कुटुंब आणि मित्रमंडळीसमवेत त्या ठिकाणी भेट देऊन निसर्गाच्या सान्निध्यात आनंद लुटला

पनवेलपासून जवळपास अर्ध्या तासाच्या अंतरावर निसर्गाच्या सान्निध्यात कर्नाळा पक्षी अभयारण्य तसेच किल्ला निसर्गप्रेमींचा आवडीचा विषय आहे. या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारचे पक्षी पहावयास मिळतात तसेच येथे जैवविविधताही आहे. त्यामुळे आवर्जून वर्षभर विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. या अभयारण्य व किल्ल्याची भुरळ अमेरिकन दुतावास (नेशन)चे मायकल हँकी यांनाही पडली आणि त्यांनी रविवारी कुटुंबीय तसेच मित्र मंडळीसह या ठिकाणी येऊन येथील निसर्गाचा आनंद लुटला तसेच ट्रॅकींग केले.

यानिमित्ताने परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. येथील निसर्गरम्य वातावरण पाहून हँकी यांनी या परिसराचे कौतुक केले.

## पोटे कुटुंबियांच्या एका युगाचा आज झाला अस्त

# स्व.कै.हरिभाऊ नारायण पोटे अनंतात विलीन





पनवेल शहरातील नामांकित असे पोटे मसालेचे संस्थापक स्व.कै.हरिभाऊ नारायण पोटे यांनी आज वयाच्या ८९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला आहे.

पोटे कुटुंबीय हे पनवेलमधील अत्यंत जुने कुटुंबिय. एकूण हे ६ भाऊ होते. त्यापैकी ५ भावांचे यापूर्वीच निधन झाले असून आज त्या भावांपैकी लहान असलेल्या हरिभाऊ पोटे यांनी पनवेल शहरातील निरामय रुग्णालयात अखेरचा श्वास सोडल्याने खऱ्या अर्थाने पोटे कुटुंबिय एका दिलदार त्याचप्रमाणे व्यक्तशील तसेच दानशुर व्यक्तीला हरपला आहे. ७५ वर्षे पूर्वी त्यांनी मिरची गल्ली येथून पोटे मसाले हा व्यवसाय सुरू केला व आजमितीस पोटे मसाले हा आता पंचक्रोशीत प्रसिद्ध असणारा असा मसाला आहे. कारण त्यांनी त्या काळी घेतलेली मेहनत महत्वाची आहे. व्यवसायाबरोबर व्यायामाची आवड असल्याने आज शेवटच्या क्षणी सुद्धा ते योगासने तसेच सायकलवरुन पनवेलभर फिरत असत. त्यामुळेच त्यांचे शरीर तंदुरुस्त होते. आ.प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या पतंग महोत्सवात सुद्धा ते हिरीहिरीने भाग घेत असत. त्यामुळे त्यांचे कौतुक सर्वजण करीत होते.

व्यवसायात सचोटी, प्रामाणिकपणा तसेच गरजू व अडलेल्या नडलेल्यांना मदत करणे हा त्यांचा स्थायी भाव होता. तसेच वक्तशीरपणा हा त्यांच्या अंगात भिनलेला होता. आज त्यांची दोन्ही मुले विनायक व मिलींद हा व्यवसाय पुढे चालवित आहेत. तसेच इतर व्यवसायात सुद्धा त्यांचा हातभार आहे. स्व.कै.हरिभाऊ पोटे यांचे मोठे बंधू भालचंद्र नारायण पोटे हे सुद्धा पनवेल नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून होवून गेले आहेत. आज त्यांच्या पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी येथील श्री





स्मरण बंगला येथून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी अंत्ययात्रेला त्यांचे नातेवाईक, समाजबांधव तसेच मोठ्या प्रमाणात विविध राजकीय पक्षाचे, सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

ADVT.

# आपत्तीबाधितांना यंदा निकषाच्या दुपटीने मदत

◆ राज्य सरकारचा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधितांना राज्य आपत्ती प्रतिसाद मदतीच्या दुपटीने मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याचा लाभ लाखो कुटुंबांना होणार आहे. केंद्राच्या नैसर्गिक आपत्ती निकषांच्या धर्तीवर राज्यातही नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास बाधितांना या निधीच्या माध्यमातून मदत केली जाते.

या मदतीमधील ७५ टक्के वाटा केंद्राचा, तर २५ टक्के भार राज्य सरकारवर असतो. केंद्र सरकारने गेल्या वर्षी नैसर्गिक आपत्तीमधील बाधितांना देण्यात येणाऱ्या मदतीत नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदतीत (२०२२-२३ ते २०२५-२६) या कालावधीसाठी भरीव वाढ केली आहे. त्यानुसार भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमवर्षाव, ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट, यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद मदतनिधीतून बाधितांना मदत मिळते, तर राज्यात केंद्राच्या निकषाशिवाय वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यासाठीही राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून आर्थिक मदत केली जाते.

राज्यातील महायुती सरकारने २७ मार्च २०२३ रोजी केंद्राच्या धोरणाप्रमाणेच राज्यातही आपत्तीबाधितांना मदत देण्याचा निर्णय घेतला होता, मात्र यंदा राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन २७ मार्च २०२३चा निर्णय शिथिल करीत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सध्याच्या मदतीपेक्षा दुपटीने मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाकडून देण्यात आली.

महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयानुसार यंदाच्या मान्सूनमध्ये म्हणजेच जून ते ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टी व पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना पुरेशी मदत तातडीने मिळावी यासाठी विशेष दराने मदत देण्यात येणार आहे. दोन दिवसांपेक्षा अधिक काळ क्षेत्र किंवा घर पाण्यात बुडाले असल्यास, घर पूर्णत: वाहून गेले असल्यास प्रतिकुटुंब कपडयांच्या नुकसानीसाठी पाच हजार आणि घरगुती भांडी, वस्तूंच्या नुकसानीसाठी पाच हजार असे १० हजार रुपये लगेच देण्यात येणार आहेत. या वेळी घर दोन दिवस पाण्यात बुडाल्याची अटही शिथिल करण्यात आली असून केवळ घरात पाणी शिरुन नुकसान झाले तरीही मदत मिळणार आहे, तर दुकानदारांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे टपरीधारकांना मदत देण्याची तरतूद राज्य आपत्ती निधीत नसली तरी यंदा मात्र मतदार यादीत नाव असलेल्या टपरीधारकांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार रुपये मदत देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

# साक्षी मिरजे उत्कृष्ट महिला अग्निवीर म्हणून सन्मानित



**महाड : प्रतिनिधी**

साक्षी मोहन मिरजे हिने नौदलातील उत्कृष्ट महिला अग्निवीर पदक पटकावले आहे. ओरिसा येथे झालेल्या एका कार्यक्रमात नौदलाचे प्रमुख दिनेश कुमार त्रिपाठी यांच्या हस्ते महिला अग्निवीरसाठी जनरल बिपिन रावत रोलिंग ट्रॉफी प्रदान करण्यात आली. साक्षी ही कोंझर येथील रहिवासी असून सध्या हे कुटुंब पुणे येथे स्थायिक झाले आहे.

आपल्या मेहनतीवर आणि जिद्दीच्या बळावर कुमारी साक्षी मोहन मिरजे ही दोन महिन्यांपूर्वीच अग्निवीर म्हणून नौदलात सामील झाली होती. लहानपणापासूनच अभ्यासामध्ये पुढे असलेल्या साक्षी मोहन मिरजे हिने वेगवेगळ्या परीक्षांना सामोरे जात अग्निवीरमधून नौदलामध्ये सामिल झाली आहे. अग्निवीरांच्या चौथ्या तुकडीची पासिंग आऊट परेड (पीओपी) शुक्रवारी (दि.९) आयएनएस चिल्का येथे आयोजित केली होती. या वेळी पीओपीचे नौदल प्रमुख डमिरल दिनेश के. त्रिपाठी, व्हाईस डमिरल व्ही. श्रीनिवास, फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, सदर्न नेव्हल कमांड हे परेडचे संचालन अधिकारी होते. ईस्टर्न नेव्हल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ व्हाईस ॲडमिरल राजेश पेंढारकर हेही या वेळी उपस्थित होते. हे उपस्थित होते. अग्निवीरांचे १६ आठवड्यांचे नौदल प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झालेल्या अग्निवीरांचा नवीन प्रवास सुरू होतो. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत अग्निवीरांना पदक आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

# माजगाव अंगणवाडीला निवारा शेड नसल्याने गैरसोय

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव येथील राजिप शाळेजवळ असलेल्या अंगणवाडीसमोर निवारा शेड नसल्यामूळे पावसाचे पाणी अंगणवाडीत येते. यामुळे लहान मुलांची गैरसोय होत असून कर्मचाऱ्यांची तारांबळ उडत आहे. त्यामुळे येथे निवाराशेड उभारण्याची मागणी होत आहे.

अंगणवाडीचे सुशोभिकरण उत्तमप्रकारे झाले असले तरीसुद्धा, अंगणवाडीत अजूनही काही समस्या कायम आहेत. लहान मुलांना अंगणवाडीत चांगले संस्कार मिळत असले तरीसुद्धा या ठिकाणी विविध समस्या निर्माण होत असल्यामुळे याकडे कोण लक्ष्य देणार? असा सवाल उपस्थित होत आहे. अंगणवाडीची समस्या विचारात घेत येथील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**“ एक ते तीन वर्षांची लहान मुले या अंगणवाडीत येत आहे. सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे हे पाणी आतमध्ये येते व लहान मुलांची बसण्याची गैरसोय होत आहे. त्याचबरोबर विविध समस्या या ठिकाणी असून ग्रामपंचायतीने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

**-सचिन काठावले, सामाजिक कार्यकर्ते**



# राज्यातील धरणांत ९६५.३२ टीएमसी पाणीसाठा

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील धरणांमध्ये रविवारअखेर ९६५.३२ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. राज्यातील प्रमुख मोठ्या, मध्यम आणि लहान धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता १४३०.६३ टीएमसी इतकी असून, धरणांत ६७.५० टक्के पाणीसाठा झाला आहे.

जलसंपदा विभागाचे निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील प्रमुख धरणांची (साठवण क्षमतेनुसार) एकूण पाणी साठवण क्षमता सुमारे १४३०.६३ टीएमसी इतकी आहे. त्यापैकी ९६५.३२ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. हा पाणीसाठा सरासरी ६७.५० टक्के इतका आहे.

पुणे विभागातील धरणांची पाणी साठवण क्षमता ५३७.२८ टीएमसी असून, धरणात ८३ टक्के म्हणजे, ४४६.०४ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. पाणीसाठ्याबाबत पुणे विभाग राज्यात आघाडीवर आहे. कोकण विभागाची एकूण पाणी साठवण १३०.८४ टीएमसी असून, पाणीसाठा सुमारे ८९.२६ टक्के, म्हणजे ११६.७७ टीएमसी इतका झाला आहे.

नाशिक विभागाची एकूण पाणी साठवण क्षमता २०९.६१ टीएमसी असून पाणीसाठा ६१.४२ टक्के, म्हणजे १२८.७५ टीएमसी इतका झाला आहे. मराठवाडा विभागाची एकूण पाणी साठवण क्षमता २५६.४५ टीएमसी असून, धरणांतील पाणीसाठा जेमतेम २६.४५ टक्क्यांवर गेला आहे. धरणांतील पाणीसाठा ६७.८१ टीएमसी झाला आहे.

अमरावती विभागातील धरणांची पाणीसाठवण क्षमता १३६.७५ टीएमसी आहे. धरणांत सुमारे ६३.८४ टक्के म्हणजे ८३.९१ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. नागपूर विभागातील धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता १६२.७० टीएमसी आहे. धरणांत ७५.०२ टक्के, म्हणजे १२२.०३ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

# विचित्र अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** खुटारी गावाच्या हद्दीत मुंब्राच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव चारचाकीने त्याच्या पुढे जाणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने दुचाकीवरील व्यक्ती पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरच्या चाकाखाली येवून त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी कारचालक शरद पाटील याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात लोकराज जेठारा (३४ रा.तळोजा फेज-१) या दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याबाबत पुढील तपास तळोजा पोलीस करीत आहेत.


**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीर सूचना** दिनांक : ०९/०८/२०२४

**जाहिरात सूचना क्र. १ सन २०२४/२०२५**

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकासकामाच्या अंमलबजावणीकरिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम/ ठराव न मा.स.दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा .पं. कार्यालय दुरुस्ती व कलरिंग करणे. | रू. २२९१०६/- मा. सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/१ | २२९१/- | ५००/- | २१/०८/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |
| २ | आकुळवाडी अंगणवाडी ते मेघनाथ गोठल रस्ता CC करणे. | रू. २८७४०२/- मा. सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/२ | २८७४/- | ५००/- | २१/०८/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |
| ३ | आकुळवाडी येथे अंतर्गत पाईप गटार करणे. | रू. २९९७००/- मा. सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/३ | २९९७/- | ५००/- | २१/०८/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |
| ४ | गुळसुंदे येथे डम्पिंग ग्राऊंड तयार करणे. | रू. ७१८०५/- मा. सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/५ | ७१८/- | २००/- | २१/०८/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |
| ५ | पलाटवाडी येथे पेवर ब्लॉक बसवणे. | रू.१८५४७०/- मा. सभा ०८/०८/२०२४ ठराव नं. ३८/४ | १८५४/- | ५००/- | २१/०८/२०२४ | १ महिना | १५ वा वित्त २३-२४ चे काम |

**१. निविदा मिळणेकरिता दि. १२/०८/२०२४ ते १४/०८/२०२४ पर्यंत लेखी अर्ज / नोंदनिकृत ठेकेदाराने सादर करणे.**
२. ठेकेदारांना कोरे निविदा प्रपत्र दिनांक १६/०८/२०२४ ते २०/०८/२०२४ सादर करणे. (सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. (१) १% इसारा रक्कम (२) ठेकेदार नोदणी प्रमाणपत्र (३) GST पत्र व इतर सोधिन जोडलेली सिलबंदनिविदा दि.२१/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील.
४. दि. २२/०८/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता समक्ष उघडणेत येतील.
५. म. ग्रा. पं लेखासहिता २०११ कलम ४५ (२) अन्वये विकास काम first call कमीतकमी ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Second Call ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Third Call २ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Fourth call १ नोंदणीकृत ठेकेदार, वैध असेल.
६. ईसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने) चेक ठेकेदाराकडून आलेला असणे आवश्यक आहे.
७. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
८. सदर कामाचे अदाज पत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
९. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
१०. निविदा फॉर्म किमत नापरतावा राहील.
११. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, २% GST १% लेवर इन्सुरन्स, १% उपकर कपात केली जाईल.
१२. २ %GST ग्रा.प. कट करील तर १६% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१३. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्या कडून जादा ५% GST कट करून घेण्यात येईल.
१४. वर्क ऑडर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबधितास जबाबदार राहावे लागेल
१५. झालेल्या तात्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्ध ते नुसार देयके अदा केली जातील. (अदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल )
१६. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१७. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायतदेखरेखीखाली करायचे आहे.
१८. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारदेवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१९. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणी नुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
२०. काम पूर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अतिम बिले दिली जाणार नाही.
२१. सोबत दिलेल्या तात्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याच आहे
२२. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२३. निविदा ओपनिंगच्या दिवशी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार हजर असणे आवश्यक आहे.
२४. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२५. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.
२६. ठेकेदारणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२७. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणे बाबत विचार करण्यात येईल/ नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील
२८. एक किवा सर्व निविदा ना मंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२९. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.
३०. एखाद्या कामाची निविदा लिफाफा ३ पेक्षा कमी आल्यास संबधित ठेकेदारांनी ओपन करू नका असा आग्रह धरल्यास सदरचा लिफाफा ओपन न करण्याबाबत विचार केला जाईल.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**मिनाक्षी भास्कर जगताप**
**सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**


# ‘तळाशेतच्या नागरिकांनी मोफत बससेवेचा लाभ घ्यावा’

**माणगाव : प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चा आयोजित येत्या ७ सप्टेंबर रोजी येणाऱ्या गणेशोत्सवाकरिता मुंबई -ठाणेमधून येणाऱ्या तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघातील नागरिकांना आपल्या गावी येण्यासाठी मोफत बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी केले आहे.

नागरिकांनी आपली बुकिंग १७ ऑगस्टपर्यंत छावा प्रतिष्ठान माणगाव व्यवस्थापक स्वप्नील सकपाळ (९९२३६६४०४१), सोहम पाटील (९८८१५३९३९७), निलेश थोरे (७७०९६५०५०३) यांच्याकडे संपर्क साधावा. मोफत बससेवेची गाडी नालासोपारा, ठाणे-खोपट, दिवा, कल्याण/डोंबिवली, मुंबई सेंट्रल, दादर, बोरिवली, घाटकोपर, पनवेल, विरार, सायन, मालाड येथून सुटणार असून बसेसचे वेळापत्रक लवकरच दिले जातील, असे थोरे यांनी सांगितले.

# मुलीची छेडछाड आणि भावाला मारहाणीविरोधात नेरळमध्ये मूक मोर्चा

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ सीएनजी पंपावर घडलेल्या घटनेनंतर सीएनजी पंप चालकावरदेखील कारवाई व्हावी म्हणून नेरळ पोलीस ठाण्यावर कर्जत हिंदू समाजाकडून रविवारी (दि.११) मूक मोर्चा काढण्यात आला आणि पोलिसांना निवेदन देण्यात आले.

बोरगावातील आकाश पाटील या तरुणाला मुस्लिम तरुणांनी बहिणीची छेडछाड केल्याचा जाब विचारल्याने बेदम मारहाण केली. या घटनेनंतर नेरळ पोलिसांनी दामत गावातील तरुणांना अटक केली, मात्र ज्या नेरळ सीएनजी पंपावर मुलीची छेडछाड केल्याची घटना घडली होती त्या पंप धारकावरदेखील कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. आगरी समाज संघटनेला वकीलांनी पाठिंबा देत मूक मोर्चा काढला. मारहाण झालेल्या आकाश पाटीलनेही सहभाग घेतला होता. ॲड. दीपक गायकवाड, ॲड. अमोल सुर्यवंशी, ॲड. नरेश अहिर, शाम कडव, ॲड. तुषार भवारे यांच्यासह



नागरिकांनी निवेदन दिले. नेरळ पोलीस ठाणे येथे जिल्हा पोलीस उपअधीक्षक टी. टी. टेले यांनी हे निवेदन स्वीकारले. ज्या सीएनजी पंपावर आकाश पाटीलला मारहाण झाली त्या पंपाचे मालकांनी घटनेचे सीसीटिव्ही फुटेज नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनात केली. या वेळी नवी मुंबई उलवे अध्यक्ष विश्व हिंदू परिषद हेमंत हजारे, ॲड. गायत्री परांजपे, सचिन धुळे भडवळ, नम्रता कांदळगावकर, माजी उपसरपंच अशोक पाटील, श्रेया चंचे, ॲड. सूर्यकांत मसणे, यांच्यासह नागरिक सहभागी झाले.

पान १ वरुन

# माथेरानला मुंबईच्या जवळ आणणार

या रस्त्यामुळे पर्यटकांचा वेळ आणि इंधन वाचणार आहे तसेच याच मार्गावर फिनॅक्युलर रेल्वेचा प्रस्ताव आहे. याकडेसुद्धा लक्ष देणार असल्याचे ते म्हणाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन धोदानी ते माथेरान असा पर्यावरणपूरक ट्रेकिंगचा अनुभव घेतला तसेच माथेरानमध्ये सफर केली. सरतेशेवटी दुपारी याचमार्गे ट्रेक करत सर्वांनी परतीचा प्रवास केला.



# हमरापूरच्या गणेशमूर्ती व्यवसायाला मिळणार समूह विकासाची जोड

गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल परराज्यांतून आणावा लागतो. समूह विकास प्रकल्पात हमरापूर येथे कच्चा माल साठवण केंद्रांची उभारणी केली जाईल. त्याचबरोबर मूर्तिकारांना प्रशिक्षण देण्यासाठी एका प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली जाणार आहे. सामूहिक प्रोसेसिंग युनिटची निर्मिती करून त्यात इंजेक्शन मोल्डींग आणि फ्लोरोसंट कलरींग मशिन्सची परदेशातून बनवून या ठिकाणी बसवून घेतल्या जातील. यांत्रिकीकरणामुळे व्यवसायाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे. गुणवत्ता वाढीस मदत होईल तसेच वेळेची बचत होण्यास मदत होणार आहे.

जे कारागिर मोठ्या किमतीची यंत्रे विकत घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी सामूहिक सुविधा दिली जाणार आहेत. पेण तालुक्यातील हमरापूर, जोहे परिसरात गणेशमूर्ती बनवणाऱ्या ३५०हून अधिक कार्यशाळा आहेत. येथे दरवर्षी जवळपास २० लाख गणेशमूर्ती तयार केल्या जातात, ज्या देशा-विदेशात पाठवल्या जातात. या मूर्तीकला व्यवसायातून दरवर्षी साधारणपणे ५० कोटींची उलाढाल होत असते. समूह विकास प्रकल्पामुळे या व्यवसायाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक १९/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक परिसरातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी निवासस्थान, कार्यालयीन इमारत आणि सीएफसी इमारतीवर अँटीटरमाइट प्रक्रिया करणे. | ₹४,०९,३८९.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील फिल्टरक्षमतेत सुधारणा, पाण्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी संप आणि ईएसआरचे अल्गेसाइड प्रक्रिया व निर्जंतुकीकरण करणे. | ₹१३,५२,०००.०० |
| ३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र... बोरिवली औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांच्या खांबांचे स्थलांतरण करणे. | ₹३८,५२,९७५.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रासाठी पोर्टेबल अल्ट्रासोनिक फ्लोमीटरचा पुरवठा करणे. | ₹१३,९५,५००.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील एचएसआर येथे लँड स्लाइडसाठी संरक्षणात्मक उपाय करणे. | ₹४०,६२,७९७.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १२/०८/२०२४ ते दिनांक १९/०८/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १४/०८/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/०८/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये वाहनतळ सुरू

**पनवेल : वार्ताहर**

४० वर्षांनंतर पहिल्यांदा तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये वाहनतळ सुरू झाले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १० एकर भूखंडावर हे वाहनतळ उभारण्यासाठी १८ कोटी रुपये खर्च केले असून पुढील पाच वर्षांसाठी या वाहनतळाची व्यवस्था सांभाळण्यासाठी ठेकेदार नेमला आहे. या ठेकेदार कंपनीने औद्योगिक विकास महामंडळाला पुढील पाच वर्षांसाठी १० टप्प्यांमध्ये तीन कोटी २५ लाख रुपये जमा करण्याच्या तत्वावर या वाहनतळाच्या देखरेखीचे काम ठेकेदार कंपनीला दिले आहे. या वाहनतळात १५५ ते २०० अवजड वाहने उभी राहू शकतील एवढी वाहनतळाची क्षमता आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये वाहनतळ सुरू करण्याची कारखानदारांची अनेक वर्षांची मागणी होती.




८७५ हेक्टर परिसरावर तळोजा औद्योगिक वसाहत विस्तारलेली आहे. साडेसहाशेहून अधिक कारखाने या वसाहतीमध्ये असून यामध्ये रासायनिक उत्पादन घेणाऱ्या कारखान्यांची संख्या मोठी आहे. वाहनतळ औद्योगिक वसाहतीमध्ये नसल्याने अवजड वाहने तासंतास रस्त्यावर उभी करून ठेवावी लागत होती. रस्त्याकडेला उभ्या असणार्या अवजड वाहनांमुळे अपघात अनेकदा वसाहतीमध्ये झाले आहेत. वाहतूक पोलीस आणि उद्योजकांनी वाहनतळाची मागणी औद्योगिक विकास महामंडळाकडे लावून धरल्याने राज्याचे उद्योगमंत्री आणि रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी वेळोवेळी हे वाहनतळ होण्यासाठी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्याने हे वाहनतळ उभे राहू शकले.

या वाहनतळामध्ये अवजड १५५ ते २०० वाहने उभी करण्याची क्षमता आहे, तसेच वाहनचालकांना आराम करण्यासाठी बोर्डींग व्यवस्था, स्वच्छतागृह, शौचालये, अवजड वाहने धुण्यासाठीचे सर्व्हिसींग स्टेशन, वाहन दुरुस्तीसाठी जागा, भोजनालयाची सोय केली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीसीटिव्ही कॅमेरा या वाहनतळात लावलेले आहेत.

> **वाहनतळ सुरू होत आहे. ही स्वागतार्ह बाब असून टीएमए संघटनेने यासाठी मी अध्यक्ष असल्यापासून पाठपुरावा केला आहे. अवजड वाहन रस्त्यांवर उभी करीत असल्यामुळे तळोजातील वाहतूक कोंडी ही मुख्य समस्या बनली होती. वाहनतळ झाल्यामुळे कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.**
>
> **–संदीप डोंगरे, उद्योजक, तळोजा औद्योगिक वसाहत**

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पनवेल महापालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या वतीने यावर्षी राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता गणेशोत्सव २०२४ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या गणेशोत्सव स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या स्पर्धेमध्ये राज्यातील पहिल्या तीन विजेत्यांना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून रोख रक्कम, व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय समिती ही जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे व ठाणे या जिल्ह्यातील प्रत्येकी तीन व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशीमधून गुणांकन व संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्यांची निवड करणार आहे.

याबरोबरच राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीने निवड केलेल्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून इतर उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रूपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

या स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेल्या सहा जणांच्या जिल्हा स्तरास्तरीय समितीमध्ये अध्यक्षपदी जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी, सदस्यपदी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक (गट अ/ब संवर्गातील), जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी (गट अ/ब संवर्गातील), जिल्ह्यातील पोलीस अधिकारी (गट अ/ब संवर्गातील), जिल्हा नियोजन अधिकारी असणार आहेत. स्पर्धेत प्रथम येणाऱ्याला पाच लाख, द्वितीय अडीज लाख, तृतीय एक लाख अशी जिल्हास्तरीय (रायगड जिल्हा) २५ हजार रुपये आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीसपदी विश्वजीत पाटील यांची फेरनियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची रविवारी भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी विशाल पाटील, समीर पाटील, ॲड. रोहित पाटील, समीर पाटील, तन्मय पाटील उपस्थित होते.**

# उरण तालुक्यात भातशेतीसाठी खतांचा तुटवडा

## ◆ खत विक्रेत्यांकडे शेतकऱ्यांची धावपळ

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामीण विभागात रासायनिक तसेच मिश्रण खतांचा तुटवडा निर्माण झाला असून, शेतकरी वर्गाला खतांसाठी धावाधाव करावी लागत आहे. खरीप हंगामात घेण्यात आलेल्या भातरोपांच्या उत्तम वाढीसाठी शेतकरी खतांचा वापर करतात, मात्र भातरोपांची वाढ जलद व्हावी, यासाठी देखील या भागात पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध नसल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांकडून ऐकवास मिळत आहेत.

जुलै महिन्यात पावसाने अगदी धुमाकूळ घातला होता. अशातच शेतकऱ्यांनी भाताची लागवड केली, मात्र सततच्या पावसामुळे भातरोपे कुजून गेली आहेत. काही प्रमाणात शिल्लक राहिलेल्या शेतकऱ्यांनी भाताची रोपे विकत आणून त्या रोपांची लागवड आपल्या शेतात केली आहे.

या कुजलेल्या पिकाला जीवदान देण्यासाठी शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा भासू लागला आहे. उरण, पनवेलमध्ये कुठेही खत उपलब्ध नसल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वेळेवर विक्रेत्यांकडून खत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची पिकांना खताची मात्रा देण्याची कामे खोळंबली आहेत, तर खतांचा तुटवडा होत असलेल्या भातशेतीसाठी लागणाऱ्या खतासाठी शेतकाऱ्यांची खत विक्रेत्यांकडे धावपळ सुरूच आहे.



> **आजच्या घडीला युरिया खताचा तुटवडा आहे. पूर्वी शेतकरी खत म्हणून शेण, गोवराचा वापर करीत असत, परंतु आता या भागात तरी गुरे पाळण्याचे प्रमाण खूपच कमी झाले असल्यामुळे शेतकऱ्यांना पर्याय म्हणून रासायनिक खतांचा वापर करावा लागत आहे. शेतकरी वर्गाला त्यांच्या पिकांसाठी खत विक्रेत्यांकडे पुरेसा खत उपलब्ध होत नसल्यामुळे हतबल झाला आहे.**
>
> **–कृष्णा म्हात्रे, शेतकरी, चिरनेर**

# पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी स्वतंत्र जागेची गरज

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेलमध्ये कुत्रे, मांजर यांसारख्या पाळीव प्राण्यांची संख्या मोठी आहे. त्यातच अद्यापही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शेती केली जात असल्याने अनेक गुरे शहरात येतात. आजार, अपघात किंवा वयोमानामुळे या प्राण्यांचा मृत्यू झाल्यास पनवेलमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नसल्याने अनेकांची अडचण होते. मृत प्राणी रस्त्यावर पडून असल्याने दुर्गंधी पसरते. या मृत प्राण्यांसाठीदेखील स्वतंत्र अंत्यविधीची जागेची गरज निर्माण झाली आहे.

पनवेलसारख्या शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या जवळपास आठ हजारांच्या घरात आहे. याव्यतिरिक्त पाळीव कुत्रे, मांजर, बैल तसेच इतर गुरेदेखील हजारोंच्या घरात आहेत. दररोज यापैकी काही प्राणी दगावतातदेखील. त्या प्राण्यांची विल्हेवाट लावताना अनेक जण त्यांना कचऱ्याच्या डब्यात फेकतात तर काही जण एखाद्या पडीक जागी फेकून देत असतात. यामुळे कालांतराने हे मृत जनावर सोडून शहरात दुर्गंधी पसरते. याकरिता या प्राण्यांसाठी स्वतत्र अंत्यविधीची जागा अथवा स्मशानभूमी असल्यास या प्राण्यांचेदेखील अंत्यविधी करता येईल. याबाबत प्राणी मित्रांनी देखील पनवेल महानगरपालिकेकडे जागेची मागणी केली आहे.

> **प्राण्यांच्या स्मशानभूमीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. आम्ही जागेच्यादेखील शोधात आहोत. लवकरच याबाबत निर्णय होईल.**
>
> **– बी.एन. गीते, पशुवैद्यकीय अधिकारी, पनवेल मनपा**

> **कुत्रे, मांजर यांसारख्या पाळीव प्राण्यांची संख्या मोठी आहे. अनेक घरांमध्ये या प्राण्यांचे स्थान घरातील सदस्यांइतकेच महत्त्वाचे असते. आजार, अपघात किंवा वयोमानामुळे या प्राण्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नसल्याने अनेकांची अडचण होत असते. याकरिता पालिकेने स्मशानभूमी उभारावी अशी मागणी पालिकेकडे केली आहे.**
>
> **–सीमा टँक, प्राणी मित्र, खारघर**

दररोज किमान पाच तरी मोकाट जनावरे मृत होत असताना या प्राण्यांच्या अत्यंविधीबाबत काहीच तरतूद नसल्याचे महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा सनियंत्रण समितीच्या सीमा टँक यांनी सांगितले.



**पनवेल : भाजपचे पाली देवद पंचायत समिती विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील यांना वाढदिवसानिमित्त रविवारी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा सुकापूर विभागीय अध्यक्ष महेश केणी आदी उपस्थित होते.**

# उरणमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**उरण : वार्ताहर**

ग्लोबल व्हिजन फाउंडेशन पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस ॲण्ड वेदिक मॅथ अकॅडमीच्या वतीने लोहगाव येथे राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला देशभरातून ७६६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेतील विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.



या अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेले काश्वी राठोर, तनुजा काळे, आराध्य मते, आर्वी पायाळ, अंशुमन रोहीला या पाच विद्यार्थ्यांना अकॅडमीच्या वतीने प्रत्येकी तीन हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उरण येथून जयंत विजय देवरे, श्लोक रवींद्र घागरे, क्षितीज प्रवीण रणवरे, साईराज सुरेश मुळे, साक्षी सुरेश मुळे, प्रगती रवी ढाकणे, कार्तिकी सोमीनाथ खरमाटे, ज्ञानेश्वरी प्रमोद डोंगरे या सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांना अश्विनी सोमीनाथ खरमाटे यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अकॅडमीच्या अध्यक्ष अर्चना शेळके, सचिव दादासाहेब शेळके, संचालक रवींद्र रकटाटे, जय शेळके, श्रीतेज रकटाटे व सर्व शिक्षक वर्गाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. प्रास्ताविकात संस्थेचे सचिव दादासाहेब शेळके यांनी अबॅकस व वैदिक गणितची माहिती दिली. आभार प्रा. चक्रधर शेळके यांनी मानले.

# पनवेलमध्ये माझी लाडकी बहीण योजनेसाठी समिती गठीत

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेलमध्ये माझी लाडकी बहीण योजनेसाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सहा सदस्यीय समितीच्या अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर असणार आहेत. तहसीलदार, गटविकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांच्यासह दोन अशासकीय सदस्य या समितीत असणार आहेत.




प्रज्ञा चव्हाण यांचीदेखील या समितीत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त मेघा दमडे या समितीत सदस्य म्हणून कार्यरत असणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची तपासणी पनवेल विधानसभा निहाय क्षेत्रनिहाय या समितीला करता येणार आहे.

संभाव्य पात्र लाभार्थी महिलांना मान्यता देऊन या याद्या जिल्हाधिकारी यांच्याकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करून त्रुटीअभावी अपात्र ठरलेल्या अर्जदार महिलांची यादी संबंधितांकडे त्रुटी पूर्ततेसाठी पाठविण्यात यावी, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

# हातमागावरील कापडाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागपंचमी, रक्षाबंधन व स्वातंत्र्य दिनानिमित्त सोलापुर येथील भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन पनवेल येथे नुकतेच करण्यात आले आहे. शहरातील काँगेस भवन हॉल, महात्मा गांधी उद्यानजवळ महानगपालिका जुना पीएमसी हॉस्पिटलशेजारी हे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.



शशिकांत बांदोडकर, श्री. मोरे, सुदाम पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. २५ ऑगस्टपर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. हातमाग, विणकाम करून तयार केलेले कापड अत्यंत चांगल्या दर्जाचे असते. त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाचा पनवेलकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हातमाग कापड प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोतन यांनी केले.

या वेळी गोवर्धन कोडम, योगेश पोतन, बाळू कोडम, दीपक गुंडू, गणेश बोल्लू, अशोक नंदाल, पुरुषोत्तम पोतन, श्रीकांत श्रीराम, लक्ष्मण उडता उपस्थित होते. या प्रदर्शनामध्ये हातमाग व यंत्रमागावर उत्पादीत कॉटन साडी, इरकल साडी, मदुराई कॉटन साडी, खादी साडी, धारवाड साडी, मदुराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, पटोला साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस, पटोला ड्रेस, खादी ड्रेस, कॉटन परकर, टॉप पीस, सोलापूर चादर, बेडशीट,



नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, दिवाण सेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी व शर्ट, कुर्ता, बंडी, पायजामा, गाऊन, टॉप वॉल हँगिंग, लेडीज हॅण्ड बॅग, पर्स, प्रवास बॅग असे विविध सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सूट ठेवण्यात आले आहे.

## संपादकीय

# देशहितालाच प्राधान्य हवे

गेल्या आठवड्यात केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत मांडले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), समाजवादी पक्ष व द्रमुक यांसारख्या स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या विरोधीपक्षांनी या सुधारणा विधेयकास विरोध दर्शवला. हे विधेयक मुस्लिमविरोधी असल्याचा विरोध करणाऱ्यांचा प्रमुख आरोप आहे. सरकारने या संदर्भातील आपली भूमिका सुस्पष्टपणे मांडली असून विधेयकाचा उद्देश गरीब मुस्लिमांना न्याय देणे आणि मुस्लिम महिलांना त्यांचा हक्क प्रदान करणे हा आहे असे सरकारने म्हटले आहे.

**केंद्र सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयकात सुचवलेल्या सुधारणा योग्य आहेत वा नाहीत हे तपासण्यासाठी विधेयकाचा मसुदा संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय सरकारनेच घेतला असून तो स्वागतार्हच म्हटला पाहिजे. देशातील मालमत्तांच्या बाबत रेल्वे मंत्रालय व संरक्षण मंत्रालय यांच्यानंतर तिसरा क्रमांक वक्फ बोर्डाचा लागतो. देशात केंद्रीय वक्फ बोर्ड आहे व राज्यांमध्ये ३० वक्फ मंडळे असून त्यांच्याकडे आठ लाख एकरहून अधिक मालमत्ता असल्याचे सांगितले जाते. वक्फ बोर्डाचा संबंध असलेली देशातील एकूण जमीन नऊ लाख ४० हजार एकर आहे. केंद्र सरकारने मांडलेल्या दुरूस्ती विधेयकात केंद्रीय वक्फ परिषद आणि राज्य वक्फ बोर्ड यांचे संलग्नीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. सुधारणेनंतर मुस्लिम महिला व बिगर मुस्लिम व्यक्तींनाही वक्फ बोर्डावर प्रतिनिधित्व मिळू शकणार आहे. कुठली मालमत्ता वक्फ बोर्डाची आहे याचा निर्णय जिल्हाधिकारी घेतील असा प्रस्ताव या सुधारणा विधेयकात आहे. सरकारी जमिनींवर वक्फ बोर्डाचा हक्क नसेल असेही विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे. कायद्याने स्थापन झालेली कोणतीही संस्था निरंकुश कारभार करत असेल, अधिकारांचा गैरवापर होत असेल तर त्यास अटकाव हा व्हायलाच हवा. धर्माशी निगडित व्यवस्थेत सुधारणा करण्याचे प्रयत्न झाल्यास विरोध हा होतोच, परंतु कोणत्याही धर्माचे रूढ रीतीरिवाज हे देशाने स्वीकारलेली लोकशाही राज्यव्यवस्था व न्यायप्रणाली यांच्या चौकटीतच असायला हवेत. वक्फ बोर्डांच्या ताब्यात असलेल्या जमिनींचा वापर मुस्लिम तसेच एकंदरच समाजाच्या हितासाठी होतो का याची चौकशी व्हायलाच हवी आहे. विविध वक्फ बोर्डांच्या गैरव्यवहाराबद्दल तक्रारी करणाऱ्या अनेक याचिका आजच्या घडीला देशातील निरनिराळी उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. यातील अनेक याचिका या मुस्लिम समाजाकरिता काम करणाऱ्या संघटनांनीच केलेल्या आहेत. एकंदर परिस्थिती पाहता सर्व वक्फ मंडळांच्या कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने कायद्यात काळानुरूप बदल व्हायला कुणाचीही हरकत का असावी? विरोधकांनी मात्र या सुधारणा विधेयकासंदर्भात राजकारण करण्यासाठी कंबर कसलेली दिसते. यापूर्वीही केंद्र सरकारने कलम ३७० संपुष्टात आणण्यासाठी पावले उचलली तेव्हा तसेच सुधारित नागरिकत्व कायद्याचे वेळीही विरोधकांनी देशहितापेक्षा राजकारण करण्यालाच प्राधान्य दिले. आता वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाबाबतही तसाच अपप्रचार होण्याची शक्यता दिसते. संबंधित विधेयक आता संयुक्त संसदीय समितीकडे गेले आहे. हिवाळी अधिवेशनात म्हणजे साधारणपणे अडीच-तीन महिन्यांनंतर समितीचा अहवाल येणे अपेक्षित आहे. मधल्या काळात मोदी सरकारने विरोधकांशी चर्चा करून या विषयावर राजकारण होऊ नये याची खबरदारी घेण्याची गरज आहे. वक्फ बोर्डाशी संबंधित कायद्यात सरकारने सुचवलेल्या दुरूस्तींमधून मुस्लिम समाजाचेच नव्हे; तर देशाचेही हित कसे साधले जाईल हे जनतेपर्यंत पोहचण्याची नितांत गरज आहे.**

# जोरदार पावसात कर्जतमधील रस्ते गेले धुवून

**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून रस्त्यांची कामे केली जातात. तालुक्यातील रस्ते जोरदार पावसात धुवून गेले आहेत. अनेक रस्त्यांवर खड्डे असल्याने अपघात होत आहेत. त्यात विशेषतः मोटरसायकलवरून प्रवास करणाऱ्या व मागे बसलेल्या महिलांना फटका बसतो. कळंब-कशेळे विभाग, पळसदरी रस्ता, कर्जत शहरातून तालुक्यात जाणारा रस्ता अशा अनेक रस्त्यांवर पावसात खड्डे पडले आहेत.

कर्जत तालुक्यात तत्कालीन आमदार देवेंद्र साटम यांनी खऱ्या अर्थाने रस्त्यांचे जाळे पसरविले होते. त्यांनी कामाचा इतका धडाका लावला होता की, कर्जत-खालापूर तालुक्यात दोन दिवसांत १०१ भूमिपूजन आणि उद्‌घाटन सोहळे केले होते. साटम यांनी तीन वेळा कर्जत-खालापूर मतदारसंघाचे विधानसभेत नेतृत्व केले होते.

कर्जत-मुरबाड रस्ता गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. या रस्त्याचे काम काही ठिकाणी झाले आहे. बऱ्याच ठिकाणी हा रस्ता दोन पदरी आहे. पावसाने रस्ते अक्षरशः धुवून गेल्याने त्यांची चाळण झाली आहे. खड्डे चुकविण्याच्या नादात अपघात होतात तसेच मोटरसायकलचालकांना वाहन चालवताना खूपच यातायात करावी लागते.

कर्जत-कल्याणदरम्यानही अनेक ठिकाणी निमुळता रस्ता आहे. काही कारणांनी तेथे रूंदीकरण करण्यात आले नाही. या रस्त्यावर आवश्यक ठिकाणी गतिरोधक हवे होते, ते त्या वेळी झाले नाहीत. शाळा असलेल्या ठिकाणीसुद्धा गतिरोधकांची मागणी केली होती. तेथे ते बसविण्यात आले. त्यासाठी शिक्षक-पालक संघाला पाठपुरावा करावा लागला. तीन-चार महिन्यांपूर्वी माजी आमदार सुरेश लाड यांना रखडलेल्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी नगर परिषदेच्या पायरीवर बसून आंदोलन करण्याची वेळ आली होती.

कर्जत-पळसदरीमार्गे खोपोली रस्तासुद्धा अनेक ठिकाणी अरूंद आहे. या रस्त्याचे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. कशेळे-कोठिंबे रस्ता अनेक महिन्यांपासून अत्यंत खराब आहे. पोशिर-पोही रस्त्याचे कार्पेट निघून गेले आहे. आदिवासी भागातील बहुतांश रस्ते खराब झाले आहेत.



माथेरानमध्येही पेव्हर ब्लॉकने केलेले उखडले आहेत.

कर्जत-चौक रस्ता आता बरा झाला होता, मात्र पावसामुळे पुन्हा खड्डे पडले आहेत. काही वर्षांपूर्वी या रस्त्याची चाळण झाली होती. नऊ किलोमीटरवर रस्त्यासाठी पाऊण तास लागत असे. वेळेवर खड्डे भरले तर हा रस्ता वाहनचालकांना सोयीचा होईल. कर्जत-कोंडीवडे, कर्जत-जांभिवली रस्त्याची अवस्थासुद्धा अनेक ठिकाणी खराब आहे. पोसरी-साळोख रस्ता हल्ली हल्ली केला होता, मात्र तो रस्तासुद्धा काही ठिकाणी खराब झाला आहे. मांडवणे ते पेज नदीकडे येणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाली आहे. नेरळ भागातील कशेळे-नेरळ रस्ताही चांगला करण्याची गरज आहे. नेरळ-कळंब रस्त्याचे कामही रखडत चालले आहे. भडवळ रस्ताही खराब आहे. खांडपे-तिवणे-सांडशी रस्त्याचे कामही चार वर्षांपासून सुरू होते. अनेक महिने ते काम बंद होते. ग्रामस्थांच्या आंदोलनामुळे ते झाले आहे. इतकेच काय तर रेल्वे पूल ते श्रीराम पूल या रस्त्याची कहाणीच वेगळी आहे. या रस्त्यावर काँक्रीट, पेव्हर ब्लॉक, डांबरीकरण यांचे प्रयोग केले आहेत. या रस्त्यावर गणपती मंदिरसमोर असे खड्डे आहेत की, तेथे मोटरसायकलस्वारांचे अपघात होत असतात. वर्षाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कर्जतला विकास कामांचे लोकार्पण करण्यासाठी येणार होते. म्हणून या मार्गावरील रस्त्यांचे काही ठिकाणी तातडीने डांबरीकरण करून डागडुजी करण्यात आली होती, मात्र धुवांधार पावसात त्या रस्त्यांची चाळण झाली आहे.

कोकणात दरवर्षी मुसळधार पर्जन्यवृष्टी होत असते. कधी कधी अनेक दिवस सातत्याने पाऊस पडतो. त्याचा परिणाम रस्त्यांवरही होतो. ते लक्षात घेता रस्ते तयार करताना जोरदार पावसाचा विचार करून तशा प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे.

# भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार डॉ. विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून विक्रम साराभाई ओळखले जातात. विक्रम अंबालाल साराभाई यांचा जन्म अमदावाद येथील एका संपन्न कुटूंबात १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला.



विक्रम साराभाई यांचे वडील हे एक उद्योगपती होते. त्यांचे बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी त्यांचे संबध असल्याने रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते. विक्रम साराभाई यांच्या आई सरलादेवी यांनी आपल्या आठ मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःची मांटेसरी पद्धतीची शाळा काढली होती. या शाळेतच विक्रम साराभाईचे शिक्षण युरोपातून आलेल्या शिक्षकांद्वारे झाले. त्याना लहानपणापासूनच गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय विशेष आवडत होते.

आपले बारावीपर्यंतचे शिक्षण आटपून १९३७ साली पुढील शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात शिकायला गेले, पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने ते भारतात परत आले व त्यांनी बंगलोरमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणावर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी भरतनाट्यम, कुचिपुडी या नृत्यकलेत पारंगत असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिकेय आणि मल्लिका ही दोन अपत्ये झाली.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर विक्रम साराभाई ब्रिटनला गेले. १९४७ साली त्यानी 'कास्मिक रे इन्वेस्टिगेशन इन ट्रापिकल लैटीट्यूड्स'वर संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आणि त्याचवर्षी ते आपल्या मायदेशी परत आले. भारतात परत येऊन त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ला अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीची स्थापना केली. हे त्यांचे पहिले पाउल होते, पुढे जाऊन अवकाश संशोधनात विक्रम साराभाई यांनी भरीव कामगिरी केली.

विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथील भारतीय प्रबंध संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५ मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. आर्यभट्टच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले. या यशामागे साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांना सन १९६६ साली पद्मभूषण आणि १९७२ साली मरणोत्तर पद्मविभूषण हे पुरस्कार भारत सरकारतर्फे देण्यात आले. ३१ डिसेंबर १९७१ साली केरळ राज्यातील कोवालम येथे रात्री झोपेतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**

## बदलते तंत्रज्ञान

# तुमच्या फोनमध्ये लपलाय 'हा' खतरनाक मालवेअर




हॅकर्स नेहमीच लोकांची विविध प्रकारे फसवणूक करत असतात. अशीच एक धक्कादायक बाब आता समोर आली आहे. एक नवीन अँड्रॉइड मालवेअर आला आहे जो तुमच्या बँक खात्यातून सहजपणे पैसे चोरू शकतो. तुमची संपूर्ण सिस्टम फंक्शन हॅक करून ती डिसेबल करू शकतो आणि एसएमएसद्वारे इतर डिव्हाइसेसवरदेखील पसरू शकतो.

या अतिशय धोकादायक अँड्रॉइड मालवेअरची माहिती एका सायबर सिक्युरिटी फर्मने दिली आहे, ज्याचं नाव इळपसेचेव आहे. मिळालेल्या माहितीनुसार हा मालवेअर पहिल्यांदा मे २०२४मध्ये दिसला होता. हा मालवेअर पुन्हा एकदा एक्टिव्ह झाला आहे. या मालवेअरपासून तुम्ही कसा बचाव करू शकता हे जाणून घेऊया...

सायबर सिक्युरिटी फर्म क्लेफीने या नवीन मालवेअर इळपसचेव बद्दल अलर्ट केलं आहे आणि सांगितलं आहे की, हा मालवेअर डिव्हाइसला संक्रमित करत आहे. या व्हायरसचे नाव BingoMod आहे जो मालवेअर डाउनलोड करण्यासाठी लोकांना खोटा मेसेज पाठवतो, मात्र हा मेसेज पाहताच तुम्हाला एखाद्या अधिकाऱ्याने मेसेज केल्याचं वाटतं. तो एक परिपूर्ण अँटीव्हायरस असल्याचं दर्शवतो आणि लोकांना फसवतो.

BingoMod मालवेअर Chrome Update, WebInfo, Secureza Web, InfoWeb आणि इतर अनेक नावांनी पाहिला गेला आहे. याला AVG अँटीव्हायरस असंही म्हटलं जातं. तुम्ही तुमच्या फोनवर जेव्हा पाहाल तेव्हा तुम्हाला तो अधिकृत असल्याचं दिसेल, कोणताही संशय येणार नाही, पण तुम्ही त्याच्या जाळ्यात अडकाल.

या मालवेअरद्वारे हॅकर्स एक लिंक पाठवतात जी तुम्हाला टेक्स्ट मेसेजद्वारे येते. तुम्ही ते डाउनलोड करण्यासाठी एका लिंकवर क्लिक केलं की एप युजर्सना सिक्योरिटी प्रोटेक्शन इनेबल करण्यासाठी एक्सेसिबिलिटी सर्व्हिसेस एक्टिवेट करण्याची सूचना दिली जाते. एकदा युजर्सनी चुकून परवानगी दिली की, मालवेअर तुमच्या डिव्हाइसमध्ये प्रवेश करतो.

# गणेशमूर्तीकार बी.आर. खेडकर

छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक थोर व्यक्तींचे प्रमाणबद्ध पुतळे बनवून शिल्पकलेच्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. ऊर्फ अप्पासाहेब खेडकर यांचा आज जन्मदिन आहे.



**निमित्त**

नव्वद वर्षांच्या आयुष्यात अनेक शिल्पकृतींद्वारे त्यांनी आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्यांत आपल्या खुणा ठेवल्या आहेत. तीन फुटांपासून साडेअठरा फूट उंचीच्या साडेचारशेहून अधिक ब्राँझ पुतळे साकारलेले खेडकर हे अव्वल दर्जाचे कलावंत होते. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील अठरा फुटी पुतळा त्यांच्याच कसबी हातातून साकारला आहे. प्रसिद्ध शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर यांनी घडविलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा पुण्यात आहे. त्यापासून अप्पासाहेबांना प्रेरणा घेतली. १२ ऑगस्ट १९२६ रोजी जन्मलेले खेडकर यांचे बालपण गरिबीत गेले, मात्र हातात कला होती. त्यांनी गणेशमूर्ती साकारण्यास सुरुवात केली. पुण्यात सोमवार पेठेत गणेशमूर्तीचा कारखाना सुरू केला. प्रमाणबद्धता, सुबकता, रेखीवपणा यांमुळे त्यांच्या मूर्ती भाविकांच्या आवडत.

पुण्यातील अनेक मंडळे गणेशमूर्ती खेडेकर यांच्याकडूनच करवून घेत. मूर्तिकामाबरोबर विविध सिनेमा कंपन्यांतील कला विभागातही ते काम करीत. या कामातून त्यांची आणि मुगल-ए-आझम चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांची भेट झाली. त्यांच्या शिल्पकलेचे कसब पाहून आसिफ यांनी 'मुगल ए आझम'च्या कला विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

मुगल बादशहाचा काळ रूपेरी पडद्यावर साकारण्याला खेडकर यांची अशाप्रकारे मदत झाली आहे. याच चित्रपटात त्यांनी मधुबाला हिच्या चेहऱ्याचा रबरी मास्क हुबेहूब बनविला. एका नृत्य कलावंताने तो मास्क घालून 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्यावर नृत्य केले आणि मधुबालाच्या नृत्याचा भास निर्माण केला. याच चित्रपटातील पृथ्वीराज कपूर, दिलीपकुमार, मधुबाला यांचे मोठे पुतळेही खेडकरांनी साकारले. १९६०नंतर त्यांनी चित्रपटक्षेत्राला रामराम करून शिल्पकलेला वाहून घेतले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्याची त्यांना प्रथम संधी मिळाली ती १९६१ साली. पहिला शाडूचा पुतळा पानशेतच्या पुरात वाहून गेला. त्यानंतर तो पुन्हा बनविला गेला आणि त्यानंतर ब्राँझचा पुतळा बनला. तो साताऱ्यात पोवई नाक्यावर आजही आहे. पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठातील पुतळा बनविला. तो उत्कृष्ट झाल्याने यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला. त्यानंतर त्यांना अनेक मान-सन्मानांनी खेडकर गौरविले गेले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**रोहा : रायगड जिल्ह्यात यंदा आतापर्यंत समाधानकारक पाऊस पडला आहे. जिल्ह्यातील धरण क्षेत्रातही दमदार पाऊस पडल्याने जिल्ह्यातील २८पैकी २५ धरणे शंभर टक्के भरली आहेत, तर उर्वरित तीन धरणे पूर्णपणे भरण्याच्या मार्गावर आहेत.**

## आरोग्य प्रहर

# फिट राहायचेय तर 'या' पदार्थांचा वापर करा!

आजकल बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन वाढत आहे. त्यामुळे फिगर चांगली व्हावी म्हणून अनेकजण फिटनेस सेंटरमध्ये घाम गाळत आहेत, परंतु कार्यालयातील बैठे काम आणि फास्टफूडचा वापर यामुळे वजनवाढ आणि बेढब शरीर ही आजकाल सर्वसामान्य समस्या झाली आहे. लठ्ठपणा ही जगभरातील समस्या बनली असून त्यामुळे अनेक आजार शरीरात घर करुन राहीले आहेत. काही वनस्पती देखील वजन कमी करण्यास मदत करीत असतात. त्या कोणत्या ते पाहूयात..



जगभरातील लठ्ठपणामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. अनेकांना बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ काढता येणे अशक्य झाले आहे. त्यांच्यासाठी या सहा वनस्पती कामी येणाऱ्या आहेत.

त्रिफळा – त्रिफळा हे नावावरुनच तीन फळांचे मिश्रण असते. यात आमलकी, बिभीतकी आणि हरितकी या फळाचे मिश्रण असते. त्रिफळा आरोग्यासाठी खूपच गुणकारी आहे. याला पचन समस्येसाठी वापरले जाते. यामुळे पचनआणि एलिमिनेशन यात सुधारणा होऊन वजन घटविण्यास मदत मिळते.

बडीशेप – बडीशेप आपण जेवणानंतर माऊथफ्रेशनर म्हणून वापरत असतो. बडीशेफ ही वजन घटविण्यासाठी देखील फायदेशीर आहे. यात विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे भूक कमी होते. आणि पचन यंत्रणेत सुधारणार होते. त्यामुळे बडीशेफ खाण्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

दालचिनी – दालचिनी ही मसाल्यात वापरली जाते. प्रत्येक भारतीय घरात दालचिनी असते. यात थर्मोजेनिक गुणधर्म असतात. जे मेटाबॉलीजम वाढवितात, तसेच चरबी जाळण्यास मदत करतात.

हळद – हळदीत अनेक औषधी गुणधर्म आहे. अनेक भारतीय पदार्थांत हळद वापरली जाते. यातील एक्टीव्ह करक्यूमिनमध्ये ॲण्टी इफ्लेमेटरी गुण आढळतात. जे चरबी जमा होण्यास रोखतात.

मेथीदाणे – मेथीदाणेदेखील वजन कमी करण्यासाठी वापरतात. यातदेखील मोठ्या प्रमाणावर फायबर असते. त्यामुळे ते आपल्याला खूप काळ भूक लागू देत नाहीत. तसेच मेथीदाण्यांचा डाएटमध्ये समावेश केल्याने ब्लड शुगर लेव्हल देखील कंट्रोलमध्ये राहाते.

# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

## जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी-१ नमुन्यात मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST) | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड येथील काळुंद्रे गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे व विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/43/2024-25 | २,९१,२४५ | ३००० | २००+३६= २३६ | ४५ दिवस |
| २. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील नवीन पनवेल, सेक्टर - १४, धारण तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/44/2024-25 | ३,९४,०३९ | ४००० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| ३. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील भिंगारी - नांदगाव रस्ता येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/45/2024-25 | ३,०१,९४३ | ३१०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| ४. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' येथील आदई तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/46/2024-25 | ८,०८,८६५ | ८१०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| ५. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील पोदी, रेल्वे भुयारी मार्ग जवळ गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/47/2024-25 | ३,३९,६५४ | ३४०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| ६. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. समिती 'क' मधील कामोठे गाव येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे. मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No. PMC/CE/49/2024-25 | ३,६४,५७५ | ३७०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| ७. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'क' येथील जुई गाव येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/50/2024-25 | २,९३,७०१ | ३००० | २००+ ३६= २३६ | ४५ दिवस |
| ८. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील ओवे पेठ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/52/2024-25 | ३,७९,६३९ | ३८०० | ५००+ ९०= ५९० | ४५ दिवस |
| ९. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील खुटूक बांधण गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/53/2024-25 | ३,७२,६०२ | ३८०० | ५००+ ९०= ५९० | ४५ दिवस |
| १०. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील रांजणपाडा येथील गणेश घाटाजवळ विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/54/2024-25 | ३,८२,१३२ | ३९०० | ५००+ ९०= ५९० | ४५ दिवस |
| ११. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील नावडे येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/55/2024-25 | ३,६४,५७५ | ३७०० | ५००+ ९०= ५९० | ४५ दिवस |
| १२. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील पापडीचापाडा येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/56/2024-25 | ३,८१,२३७ | ३९०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १३. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील मुर्बी तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/57/2024-25 | ३,७४,०५६ | ३८०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १४. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब खिडूकपाडा गावातील गणेश घाटाची दुरुस्ती आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/59/2024-25 | ३,३५,०८० | ३४०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १५. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील खारघर, सेक्टर-१० येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/60/2024-25 | ३,४०,७२६ | ३४०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १६. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील तळोजा फेज-१ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/61/2024-25 | ३,५३,२०६ | ३६०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १७. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'ब' येथील सेक्टर- २, खांदा कॉलनी शंकर मंदिर गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/62/2024-25 | ४,८३,१६६ | ४९०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १८. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'ब' येथील सेक्टर- १२, कळंबोली गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/96/2024-25 | ४,९८,२८६ | ५००० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| १९. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर सेक्टर-१४ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/97/2024-25 | ३,९४,६९४ | ४००० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| २०. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' येथील खारघर-कोपरा सेक्टर-१५ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) Tender No.PMC/CE/98/2024-25 | ३,९२,९११ | ४००० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |
| २१. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - 'अ' मधील बेलपाडा सेक्टर-०७ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) Tender No.PMC/CE/99/2024-25 | ३,६४,५७५ | ३७०० | ५००+९०= ५९० | ४५ दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक १३/०८/२०२४ पासुन दि. २६/०८/२०२४ पर्यंत सांय. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सीलबंद निविदा दि.२८/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.२८/०८/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही /-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपलिका**

**जा.क्र पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३५०/३५१/२०२४**
**दि.०९/०८/२०२४**

(पान ७ वर..)

## निवडक

### भिंगारी येथून रिक्षाची चोरी

**पनवेल** : भिंगारी गावाजवळ उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. महेश काशिद यांनी त्यांची ऑटोरिक्षा भिंगारी गावाजवळ असलेल्या महावितरण कंपनीच्या ऑफिस समोरील रस्त्यावर उभी करून ते कामानिमित्त आत गेले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांची रिक्षा पळवून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### लाखोंच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल** : तालुक्यातील केवाळे येथील घराचा लॉक तोडून चोरट्याने आत प्रवेश केला आणि कपाटात ठेवलेले चार लाखांचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रवीण पाटील हे केवाळे येथे राहत असून घराजवळ त्यांचे वडील आणि आई राहतात. गुरुवारी त्यांच्या वडिलांच्या घराचे लॉक तुटले असल्याचे गावातील एका नागरिकांनी सांगितले. ते घरी आले असता कपडे अस्ताव्यस्त पडले होते व लोखंडी कपाट उघडे होते. त्यातील सोन्याचे गंठण आणि कानातील झुमके चोरट्याने चोरून नेले आहेत.

### ग्राहकाकडून ज्वेलर्सची फसवणूक

**पनवेल** : ज्वेलर्सच्या दुकानातून सोन्याची चेन विकत घेऊन त्यांनी एनईएफटी केल्याचे चुकीचे भासवून प्रत्यक्षात ते व्यवहार केले नाहीत व ते पैसे बँक खात्यात आले नाहीत. त्यामुळे पी.के. श्रीवास्तव यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सुरेंद्र काकरेचा यांचे वडिलांच्या नावावर असलेले प्रिन्स ज्वेलर्स जोशी आळी येथे आहे. जून महिन्यात एक इसम चेन घेण्यासाठी आला आणि त्याने एक लाख २० हजार रुपयांची चेन विकत घेतली व दोन टप्प्यात एनईएफटी व्यवहार केले होते. त्याचा स्क्रीनशॉट दाखवला असता त्याचे फोटो त्यांनी काढले. बँकेत जाऊन चौकशी केली असता दोन तासांत पैसे खात्यावर येतील, असे त्यांनी सांगितल्याने सोन्याची चेन त्याला देऊन टाकली. दोन तासांनंतर बँकेत चौकशी केली असता पैसे बँकेत आले नाहीत. अखेर पि.के. श्रीवास्तव नामक इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### लाखो रुपयांच्या प्लेट्स चोरल्या

**पनवेल** : गोडाऊनमधून एक लाख ६८ हजार किमतीच्या १७ ॲल्युमिनियम प्लेट्स चोरल्याप्रकरणी करण (रा. कल्याण फाटा) याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जावेद खान हे मल्टीस्टोरेज प्रोजेक्ट लिमिटेड या कंपनीत सुपरवायझर म्हणून नोकरी करतात. कंपनीत अल्युमिनियम फोमवर्क बनवतात. या कामासाठी लागणारे मटेरियल गोडाऊन रोहिंजन येथे बाहेर आणि आतमध्ये ठेवले जाते. या ठिकाणी ॲल्युमिनियम प्लेट्स कमी दिसून आल्या. त्यांनी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता दोन अनोळखी इसम पहाटे चोरी करताना दिसून आले. या वेळी एकाचे नाव करण असल्याचे समजले.

# खारघर-तुर्भे भुयारी मार्गासाठी पुनर्वसन आराखडा

## मार्गातील झोपड्यांचे लवकरच होणार बायोमेट्रिक सर्वेक्षण




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच जवाहरलाल नेहरू बंदरामुळे ठाणे-बेलापूर, शीव-पनवेल महामार्गावर दररोज वाढणारी वाहनसंख्या लक्षात घेऊन सिडकोकडून आखण्यात आलेल्या खारघर-तुर्भे भुयारी मार्ग (केटीएलआर) उभारणीत अडथळा ठरत असलेल्या काही कंपन्या तसेच झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि सिडकोने संयुक्त आराखडा तयार केला आहे.

या रस्त्याच्या उभारणीत एमआयडीसीच्या जमिनीवर तीन मोठ्या कंपन्यांसह जवळपास ११ हजार ७६७ चौरस मीटर क्षेत्रावर उभ्या असलेल्या बेकायदा झोपड्या पाडाव्या लागणार आहेत. या झोपड्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षणाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून तेथील रहिवाशांच्या पुनर्वसनाची जबाबदारी यापुढे सिडकोवर राहणार आहे.

नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली तसेच आसपासच्या शहरांमधील बाह्य वाहतुकीसाठी ठाणे-बेलापूर रस्ता महत्त्वाचा मानला जातो. मुंबईतून थेट डोंबिवलीच्या दिशेने जाण्यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने ऐरोली-काटई मार्गाच्या उभारणीचे काम हाती घेतले असले तरी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि उरणच्या जवाहरलाल नेहरू बंदरामुळे या मार्गावरील वाहतुकीचा भार कायम राहील अशीच चिन्हे आहेत. ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातून वाहनांचा भार ठाणे-बेलापूर तसेच शीव-पनवेल महामार्गावर येत असतो. हा भार कमी करण्यासाठी सिडकोने तुर्भे-खारखर भुयारी मार्गाची आखणी केली आहे.

शीव-पनवेल महामार्गालगत असलेल्या जुईनगर (रेल्वे स्थानकाजवळ) ते खारघर येथील गुरुद्वारा जंक्शनपर्यंत उन्नत मार्ग बांधण्याचे प्रस्तावित आहे. हा रस्ता ५.५६ किमी अंतराचा असून त्याची साधारण दीड किमी अंतराची लांबी ही एमआयडीसी भागातून जाते. या रस्त्यामध्ये वनविभागाच्या क्षेत्रात साधारणपणे १.७६ किमी अंतराचे दोन बोगदे केले जाणार आहेत. या रस्त्याचे ५.५० मीटर उंचीचे खांब (पिलर्स) एमआयडीसी भागात उभारले जाणार आहेत. या रस्त्याची रुंदी ३० मीटर इतकी असेल. एमआयडीसी हद्दीत हा रस्ता उन्नत बांधला जाणार असून तेथूनच तो डोंगरापर्यंत पोहचविला जाणार आहे.

## सुपरवायझरवर केला चाकूने जीवघेणा हल्ला

### आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

एका हॉस्पिटलच्या सुपरवायझरवर एका इसमाने चाकूहल्ला केल्याची घटना पनवेल शहरातील लाईफ लाईन हॉस्पिटलच्या प्रवेशद्वाराजवळ घडली. या प्रकरणी आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आरोपी राकेश विश्वकर्मा (५० रा.वाशिवली गाव) हा लाईफ लाईन हॉस्पिटलच्या काऊंटरवर येऊन सुरक्षारक्षकांची हुज्जत घालून त्यांना दमदाटी करीत होता. हॉस्पिटलमध्ये सर्वांना गलिच्छ शिवीगाळ करीत होता. या वेळी तेथील सुरक्षारक्षकांनी त्याला हॉस्पिटलच्या बाहेर काढले असता त्याचा राग मनात धरुन तो तेथील एका सुरक्षारक्षकाकडे पाहून त्याला मारण्यासाठी जात असताना तेथील सुपरवायझर संजय वाघ यांनी राकेश विश्वकर्मा याला अडविले असता राकेश याने संजय वाघ यांच्या पोटाच्या बरगडीच्या खाली चाकू मारुन त्यांना दुखापत केली.

या वेळी परिसरातील नागरिकांनी त्वरित राकेश विश्वकर्मा याला पकडून ठेवले व तातडीने संजय वाघ यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले, तसेच पनवेल शहर पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली असता त्वरित घटनास्थळी येऊन आरोपीला ताब्यात घेतले आहे.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**


परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

या इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, डोक्याचे केस बारीक, दाढी मिशी वाढलेली, उंची अंदाजे पाच फुट, उजव्या पायाच्या मांडीला व गुडघ्याजवळ जळालेली जुनी जखम असून अंगात निळ्या रंगाची हाफ पॅन्ट व मिलिटेरी रंगाचा शर्ट त्यावर काळसर रंगाचा रेनकोट घातला आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सोशल मीडियातून मैत्री करून अत्याचार; आरोपीचा शोध सुरू

**पनवेल : वार्ताहर**




खारघरमध्ये राहणाऱ्या तरुणाने १५ वर्षीय मुलीसोबत इन्स्टाग्रामवरून मैत्री करून तिच्यावर खारघर, सेक्टर २१मधील फ्लॅटवर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या आरोपीने पीडित मुलीला धमकावून तिच्याकडून चार तोळे वजनाचे दागिने लुबाडून नेल्याचे उघडकीस आले आहे. रिषभ असे या तरुणाचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील १५ वर्षीय पीडित मुलगी तसेच तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी रिषभ दोघेही खारघरमध्ये राहण्यास आहेत. रिषभ याने जून महिन्यामध्ये मुलीसोबत इन्स्टाग्रामवरून ओळख वाढवून मैत्री केली होती. त्यानंतर त्याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करुन तिला गिफ्ट स्वरुपात अंगठी देऊन तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर रिषभ याने तक्रारदार मुलीला सेक्टर २०मधील हॉटेलमध्ये तसेच फ्लॅटमध्ये नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर रिषभने तिला गिफ्ट दिलेली अंगठी परत मागून घेतली तसेच त्या बदल्यात तिच्याकडे दागिन्यांची मागणी केली, अन्यथा तिची बदनामी करण्याची धमकी दिली. त्यामुळे पीडित मुलीने आपल्या घरातील चार तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून ते आरोपी रिषभ याला दिले.

पीडित मुलीच्या आईने घरामध्ये दागिन्यांची शोधाशोध सुरू केल्यानंतर तिने रिषभकडे आपल्या दागिन्यांची मागणी केली असता, त्याने दागिने देण्यास नकार दिला. त्यानंतर पीडित मुलीने या प्रकाराची माहिती आपल्या आईला दिल्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी रिषभ याचा शोध सुरू केला आहे.

## गव्हाण विद्यालयात नाग शिल्पांच्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन; विजेत्यांचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये सांस्कृतिक उत्सवाचे प्रतिक आणि अन्नसाखळीत विशेष महत्त्व असणाऱ्या सर्प जीवांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या नागपंचमी सणानिमित्त आयोजित नाग शिल्प प्रदर्शन भरवून हा सण अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी इयत्ता नववी अ च्या वतीने नागपंचमीचा कार्यक्रम घेण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावीच्या बहुतांश विद्यार्थ्यांनी आपल्या सृजनशीलतेचे अधिक समृद्ध प्रदर्शन करीत माती, कणिक, कापड, कागद आदी सहज उपलब्ध होणाऱ्या पदार्थ आणि वस्तूंपासून नाग शिल्पांच्या प्रतिकृती तयार करून प्रदर्शनात मांडल्या.

या वेळी प्रदर्शनासाठी ठेवण्यात आलेल्या नागशिल्पांच्या प्रतिकृतींचे विद्यालयाच्या सर्व महिला रयतसेविकांनी नाग पूजन केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वर्गशिक्षक व आदर्श विज्ञान शिक्षक शितलकुमार म्हात्रे यांनी नागपंचमीचे सांस्कृतिक, धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व सांगणारे चित्रफलक प्रदर्शित करून विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कलाशिक्षक जी. जी. भोईर यांनी परीक्षण करून प्रथम तीन क्रमांक घोषित केले. या वेळी ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, योगिता पाटील, सुजाता शेलार, अपर्णा देवकुळे, रोहिणी घरत, सांस्कृतिक विभागप्रमुख एच. आर. पाटील, सोनाली घरत, जोत्स्ना कोळी आदी महिला अध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते.

## बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत वर्षावास कार्यक्रम



**पनवेल** : बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार आणि भारतीय बौद्ध महासभा, विभाग क्र. १४ यांच्या वतीने सुरू असलेल्या वर्षावास कार्यक्रमाच्या मालिकेचे पुष्प गुरुवारी गुंफण्यात आले. या वेळी प्रसिद्ध प्रवचनकार, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुनील वाघपंजे यांनी सिगाल सुत्त (सिगालोवाद सुत्त) या विषयावर प्रवचन दिले.

ते म्हणाले, बुद्धांच्या सिगाल सुत्तात कौटुंबिक जीवनात असणाऱ्या व्यक्ती आई-बाप, मुलगा-मुलगी, पती-पत्नी, शैक्षणिक व सामाजिक जीवनातील गुरु-शिष्य (शिक्षक- विद्यार्थी), आप्त-मित्र, नोकर-मालक, धार्मिक जीवनातील धम्मगुरु भंते आदी जनांशी सौजन्यपूर्वक आणि जबाबदारीने कशाप्रकारे वागावे, याविषयी सांगितले आहे. या सुत्ताचे पालन केल्यास आपले जीवन सुखी आणि समाधानी राहील. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सामाजिक कार्यकर्ते सुजित खांडिझोड यांनी भूषविले होते.

कार्यक्रमात उपस्थितांसाठी विशेष संधी दिलेल्या वेळेत ॲड. शिवकुमार कांबळे, उपसिका सिता सोनवणे व बौद्धाचार्य अशोक मिसाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांनी केले.

## नवी मुंबईत हिवताप, डेंग्यू, साथरोगविरोधी अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सद्यस्थितीत पावसाची ये-जा सुरू असल्याने हिवताप, डेंग्यू, जललन्य व साथरोग आजारांसाठी ही परिस्थिती संवेदनशील आहे. त्या अनुषंगाने नमुंमपा आरोग्य विभागामार्फत हिवताप, डेंग्यू यासारख्या आजारांचा प्रसार रोखण्याकरीता महापालिका कार्यक्षेत्रात २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये हिवताप, डेंग्यू तसेच जललन्य व साथरोग आजारांबाबत प्रात्यक्षिके व मॉडेल्ससह जनजागृती करण्यात आली तसेच त्या क्षेत्रातील तापाच्या रूग्णांचे रक्तनमुनेही तपासण्यात आले. दोन दिवस आयोजित केलेल्या या शिबिरांमध्ये एकूण १९,६१५ नागरिकांनी शिबिरांचा लाभ घेतला. या ४८ ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये २४९१ रक्तनमुने घेण्यात आले. हे रक्तनमुने तपासणीअंती अदूषित असल्याचे आढळून आले. सोमवारी (दि.१२) श्रावणी सोमवारचे औचित्य साधून २४ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांच्या परिसरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

याप्रमाणे नमूद २४ ठिकाणी सर्व तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने घेण्यात येणार आहेत, तसेच हिवताप, डेंग्यू, जललन्य व साथरोग आजारांबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात येणार आहे. या शिबिरांची वेळ सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत असणार आहे.






पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे आणि धाकटा खांदा येथील रत्नदीप स्पोर्ट्स क्लबच्या वतीने दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी दिव्यांश संदीप म्हात्रे बारावी (सायन्स)मध्ये ८७.६७ टक्के, स्वराज गणेश भगत पदवीधर (केमिस्ट्री)मध्ये १० पैकी ९.०५ गुण, संकेत संजय पाटील (आयटी, एमबीए) आणि गौरी गिरीश म्हात्रे दहावीमध्ये ९५.२० टक्के मिळविल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.




### मुक्तछंद पाऊस

रपरप चालून अजून कसा रे नाही थकलास?
पावलं तुझी अजून कशी रे नाही दुखली?

धाय मोकलून रडावं तसा व्यक्त होतोस
अंतरीचा दुःखावेग ओतून झोडपून काढतोस,
तांडव करून प्रदूषणावरचा राग दाखवतोस की
धरित्रीच्या कुशीत शिरून विसावा तू शोधतोस?
धो धो कोसळून अजूनि विटला नाहीस कसा?

कवीबिविंना आवडतोस रे तू असा तसा
कसाही झिम्माडसा हलकासा,
प्रेमिकाबिमिकांना भावतोस
रिमझिम श्रावणसरींसारखा,
श्रावण बिवण हल्ली तुही झालास पाळेनासा
शेतकरीही आताशा झालाय शिणलासा,

विनवतो तुज लावणीला दे आता जरा दिलासा
आम्हालाही छत्र्या रेनकोट वाटतोय अपुरासा,
वडेभजीदेखील रागावलेत तुझ्यावर आताशा
भादव्यातल्या झोक्यांचाही मिळो आनंद जरासा,

झाकोळले रवितेज कर दूर मेघांचा आडोसा
क्षितिजापल्याड जाऊन कर आराम किंचितसा,
पर्जन्य राजा तारणहार रे तू आम्हा सर्वांचा
नको माजवू हाहाकार दे इंद्रधनूचा दिलासा!



-लतिका गांगल,
मोहोपाडा, रसायनी

(पान ५ वरुन..)

# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

## जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरीता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी-१ नमुन्यात मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST) | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत+ १८% विक्री कर= एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -'ड' मधील भु.क्र.०४, सेक्टर-१२ खांदा कॉलनी येथे गणेशमुर्ती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१००/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१८, अं.भु.क्र.१२२ येथे गणेशमुर्ती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१०१/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३. | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील अं.भु.क्र. ५३८ तालुका क्रीडासंकुल येथे गणेशमुर्ती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव बांधणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१०२/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ४ | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- 'क' येथील कामोठे, सेक्टर-३५ मध्ये गणेश विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१०३/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अं.भु.क्र.१८८ गुणे हॉस्पिटल शेजारी कृत्रिम तलाव तयार करणे व विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१०४/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ६ | गणेशोत्सव २०२४ करीता कामोठेमधील सेक्टर-२१, प्लॉट नं.३३, या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/१०५/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ७ | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- 'क' येथील कामोठे, सेक्टर-२२ मध्ये गणेश विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६३/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ८ | गणेशोत्सव २०२४ करीता कामोठेमधील सेक्टर-०९, प्लॉट नं.१०, ऐश्वर्या हॉटेलजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६४/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ९ | गणेशोत्सव २०२४ करीता कामोठेमधील सेक्टर-३२, प्लॉट नं.०१ जुई गाव रोड या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६५/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १०. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-३२ साई मन्नत सोसायटीजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६६/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ११ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-३५, प्लॉट नं. व ०१ हाईड पार्क सोसायटी जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६७/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १२ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-२४ मुर्बी गणेश घाट या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/६८/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १३ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-३५ प्रशांत कॉर्नरजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे Tender No.PMC/CE/६९/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १४ | गणेशोत्सव २०२४ करीता पडघे गाव या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७०/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १५ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील नावडे फेज -II प्लॉट नं.३९/४० येथे कृत्रिम तलाव तयार करणे. Tender No.PMC/CE/७१/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १६ | गणेशोत्सव २०२४ करीता नवीन पनवेलमधील शांतीनिकेतन पब्लिक स्कुल जवळील प्लॉट नं.३६, सेक्टर-२ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७२/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १७ | गणेशोत्सव २०२४ करीता नवीन पनवेलमधील गुरुद्वाराजवळील सेक्टर-५ अ, प्लॉट नं.१ अ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७३/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १८ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-०८, प्लॉट नं.०१ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७४/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| १९ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर (कोपरा) येथील साई प्रसाद रेसिडेन्सी शेजारील सेक्टर-१०, प्लॉट नं. २५२ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७५/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २० | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-०७, प्लॉट नं.१९ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे. आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७६/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २१ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील सेक्टर-१८, प्लॉट नं.३७ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे. आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७७/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २२. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील उत्सव चौक समोरील प्लॉट नं.२अ, सेक्टर-०४ या ठिकाणी कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७८/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २३. | गणेशोत्सव २०२४ करीता सेक्टर-१७, प्लॉट नं.०४ कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/७९/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २४. | गणेशोत्सव २०२४ करीता सेक्टर-११, प्लॉट नं. १४ व १५ कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/ ८०/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २५. | गणेशोत्सव २०२४ करीता सेक्टर-१, प्लॉट नं. २८, कळंबोली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८१/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २६. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील तळोजा फेज-१ आयेशा हॉटेल जवळील ग्राऊंड येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८२/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २७. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील धरणा गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८३/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २८. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील गावदेवी मैदान जवळ सेक्टर-१२ येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८४/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| २९. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील कामधेनू इमारत जवळ सेक्टर-१४ येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८५/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३०. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील रोहिंजण गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८६/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३१. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील स्वर्ण गंगा ज्वेलर्स जवळ सेक्टर-१५ येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८७/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३२. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील तळोजा फेज -१, पेठाली येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८८/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३३. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघरमधील तळोजा फेज -२ सेक्टर-२५ जवळील ग्राऊंड येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/८९/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३४. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर येथील सेक्टर-११ खेळाचे मैदान येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे Tender No.PMC/CE/९०/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३५. | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर, सेक्टर-२१ ग्रामविकास भवन जवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे Tender No.PMC/CE/९१/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३६. | गणेशोत्सव २०२४ करीता रोहिंजण नवीन वसाहत येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे Tender No.PMC/CE/९२/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |
| ३७. | गणेशोत्सव २०२४ करीता धानसर गाव येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/CE/९३/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२०० | ५००+९०=५९० | १५ दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक १३/०८/२०२४ पासून दि.२६/०८/२०२४ पर्यंत सांय. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सीलबंद निविदा दि.२८/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.२८/०८/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.३५०/३५१/२०२४
दि.०९/०८/२०२४

सही /-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

# घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत पनवेल महापालिकेतर्फे मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने घरोघरी तिरंगा या उपक्रमांतर्गत तिरंगा सन्मानार्थ तिरंगा मॅरेथॉन रविवारी (दि. ११) घेण्यात आली. भारतमाता की जय, वंदे मातरमच्या घोषणा देत पनवेल शहरातील महापालिका मुख्यालय ते वडाळे तलावापर्यंत या तिरंगा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

केंद्र शासनाच्या घरोघरी तिरंगा उपक्रम अंतर्गत पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा मॅरेथॉन झाली. यामध्ये सुमारे ४००हून अधिक विद्यार्थी, नागरिक, महापालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा विभाग आणि स्वच्छतादूत यांनी सहभाग घेतला.



महापालिका कार्यालय, जय भारत नाका, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, बल्लाळेश्वर मंदिर, के.वी. कन्या शाळा यामार्गे जाऊन शेवटी वडाळे तलाव येथे मॅरेथॉनची सांगता करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७व्या वर्धापन दिनानिमित्ताने शासन निर्देशानुसार ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत महापालिका कार्यक्षेत्रात घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत १२ ते १४ ऑगस्ट रोजी बचत गटांमार्फत तिरंगा मेलाचे आयोजन करण्यात येणार आहे. १३ ऑगस्ट रोजी देवकी मीडिया प्रस्तुत ऐ वतन तेरे लिये या देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम होणार आहे, तर १४ ऑगस्ट रोजी तिरंगा सन्मानार्थ बाइक व सायकल तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. याबरोबरच महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस घरोघरी तिरंगा फडकवावा. त्यासोबतचे स्वत:चे सेल्फी काढून www.harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करावे, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# द्रोणागिरी मॅरेथॉनमध्ये प्रेम ठाकूरने मारली बाजी





**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने रविवारी (दि. ११) घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व सुयश प्राप्त केले.

या २१ किमी अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत वीर वाजेकर महाविद्यालयातील प्रेम संतोष ठाकूर या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक, तर प्रेमल प्रमोद पाटील याने तृतीय क्रमांक पटकाविले. त्याचप्रमाणे १८ वर्षाखालील १० किमी या गटात मुन्ना सोनालाल राय चतुर्थ क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.जी. पवार, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. धावपटू खेळाडूंना जिमखाना प्रमुख डॉ. विलास महाले, देवेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

## रायगड

# मुरूड समुद्र किनाऱ्याची नगर परिषदेकडून स्वच्छता

**मुरूड : प्रतिनिधी**

घरोघरी तिरंगा झेंडा अभियानांतर्गत मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबून समुद्रकिनारा स्वच्छ व सुंदर करण्यात आला. या मोहिमेत १.५ टन कचरा उचलण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, प्रकाश आरेकर, प्रशांत दिवेकर, सतेज निमकर, मितेश माळी, अविनाश अवघडे, सीताराम पतेने, विनायक तळेकर, जयवंत तळेकर, सचिन कोरके, लिशान मुकादम, अमोल रणदिवे, संतोष तवसाळकर, बहादूर शिंदे, जय भिसे, अफान आगा, राकेश म्हशीलकर आदींसह समुद्रकिनाऱ्यावरील टांगेवाले, घोडेवाले व अन्य व्यावसायिकदेखील सहभागी झाले होते.



पावासामुळे समुद्रकिनाऱ्यावर प्लॅस्टिक पिशव्या व तत्सम कचरा पसरला होता. तो नगर परिषदेच्या बीच क्लिनिंग मशीनच्या सहाय्याने गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

स्वच्छता ही देशव्यापी सेवा आहे. स्वच्छतेचे महत्त्व सर्वांनीच जाणले पाहिजे तरच आपले शहर स्वच्छ व सुंदर राहील, असे सांगून आपले शहर पर्यटन क्षेत्र आहे. स्वच्छ व सुंदर मुरूडने पर्यटकांना भुरळ घातली पाहिजे तरच ही मोहीम यशस्वी होईल, अशी प्रतिक्रिया प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांनी या वेळी बोलत होते.

# आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात सीकेटी आणि पिल्लई कॉलेजचा दबदबा

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठांतर्गत ५७वा आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सव कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयामध्ये झाला. एकूण २७ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सहभाग घेतला होता. यामध्ये पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) व पिल्लई महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी जास्त पारितोषिके पटकावून आपला दबदबा कायम ठेवला.

युवा महोत्सवाचे उद्घाटन समन्वयक निलेश सावे यांच्या हस्ते करण्यात आले. या महोत्सवात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली.



पारितोषिक वितरण समारंभास संस्थेचे सचिव प्रदीपचंद्र श्रृंगारपुरे, झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, डॉ. अमोल चांदेकर, समन्वयक निलेश सावे, डॉ. पराग कारुळकर, डॉ. दीपक गायकवाड, प्रा. विभूती खेडेकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून नितीन केणी, अभिजीत पवार, डॉ. राहुल शेट्टी, विभूती खेडेकर, पूनम चांदुरकर, विवेक वरभुवन, ज्योत्स्ना शिंदे, निलेश सिंगुवा, कृष्णा काटे, राहुल वैद्य, अरुण कदम, संजय तोडणकर, रामनाथ काठोरे, गीता निखर्गे, नंदकुमार सावंत, प्रतीक फणसे, वैष्णव चव्हाण, क्षितिजा घाणेकर, नालीन कुरेशी, विजय जाधव, तृप्ती अगरवाल यांनी काम पाहिले.

# रातवड विद्यालयात तिरंगा रॅली उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७७व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून माणगाव तालुक्यातील रातवड येथील माध्यमिक विद्यामंदिरच्या वतीने देशभक्तीने ओतप्रोत विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून तिरंगा रॅली काढण्यात आली होती.

या रॅलीत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ व पालक सहभागी झाले होते. गावातील श्री स्वामी समर्थ मठातून तिरंगा रॅलीला सुरुवात होऊन मुख्य रस्त्यावरून रॅली काढण्यात आली.



रॅलीमध्ये तिरंगी झेंडे हातात घेऊन व देशभक्तीपर गीते गाऊन घोषणा देत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांचे मार्गदर्शन व ग्रामस्थ व पालकांच्या सहकार्यातून अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात रॅली झाली.

### गडब रहिवासी संघटनेच्या अध्यक्षपदी संजय चवरकर

**पेण : प्रतिनिधी**

मूळ गडब येथील रहिवासी, परंतु आता पेण शहरात राहणाऱ्या गडब रहिवासी संघटना पेणचा वर्धापन दिन नुकताच झाला. या वेळी नवीन कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली.

या कार्यकारिणीत अध्यक्ष म्हणून संजय रघुनाथ चवरकर, उपाध्यक्षपदी केशव पाटील, सेक्रेटरी महेंद्र महादेव कोठेकर, खजिनदार मोरेश्वर गोवर्धन कडू, सदस्य म्हणून मोतीराम पाटील, जगदीश पाटील, विश्वनाथ कोठेकर, किशोर कोठेकर, नितीन पाटील, रामचंद्र म्हात्रे, दिलीप कोठेकर यांची निवड झाली. या वेळी संघटनेतील के.पी. पाटील, एल.के. म्हात्रे, दिलीप कोठेकर, मोहन कोठेकर, मारुती पाटील इत्यादी सेवानिवृत्त सभासदांना तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व संघटनेचे सल्लागार रमाकांत पाटील, विनायक कोठेकर यांना सन्मानित करण्यात आले.

# तांबाटी ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे घरोघरी तिरंगा अभियान

**चौक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने १३ ते १५ ऑगस्टदरम्यान घरोघरी तिरंगा झेंडा हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची जनजागृती तांबाटी ग्रुप ग्रामपंचायतीने सुरू केली आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव झाल्यानंतरही हे अभियान राबवून देशाप्रती अभिमान बाळगण्याची संकल्पना आहे. तांबाटी ग्रामपंचायतीच्या वतीने हद्दीतील सर्व गावे, वाड्या येथून जनजागृतीस सुरुवात करण्यात आली आहे, यात विद्यार्थी, तरुणवर्ग, महिला मंडळ, बचत गट, जेष्ठ नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी, शाळांचे शिक्षक यांचा सहभाग आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात क्रांतिकारांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभियानाला सुरूवात करण्यात आली असून १५ ऑगस्ट रोजी झेंडा वंदनाचा कार्यक्रम होईल, असे ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांनी सांगितले.

या अभियानावेळी सरपंच अविनाश आमले, सदस्य संतोष दळवी, हरिभाऊ जाधव, सामजिक कार्यकर्ते विश्वास पाटील, प्रसाद कदम, शाळेचे शिक्षक, ग्रामपंचायत कर्मचारी, गावातील ग्रामस्थ व युवक हजर होते.




# मुरूड तालुक्यात भातलावणी अंतिम टप्प्यात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात समाधानकारक पाऊस पडल्यामुळे बळीराजा कामात व्यस्त झाला असून तालुक्याच्या खारपट्ट्यात तसेच सखल भागातील भातलावणी शंभर टक्के पूर्ण झाली आहे, तर येत्या दोन-तीन दिवसांत पाणथळ जमिनीवर लागवड पूर्ण होईल, अशी माहिती कृषी खात्यामार्फत देण्यात आली.

कोकणात खरीप हंगामातील भात हे सर्वाधिक घेतले जाणारे पीक आहे. लावणीसाठी शेतकरी रोजंदारीवरील मजुरांसह शेतात राबताना दिसत आहेत. मुरूड तालुक्यात भात लागवड क्षेत्र ३३०० हेक्टर असून अत्यल्प भूधारकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

भाताच्या विविध वाणांमध्ये सुवर्णा, जया, वाडा कोलम, रूपाली, चिंटू, श्री, शुभांगी, सारथी, कोमल, जोरदार आदी प्रकार उपलब्ध असले तरी येथील शेतकरीवर्ग सुवर्णा, जया, वाडा कोलम, चिंटू या वाणांना अधिक प्राधान्य देतात. पारंपरिक पद्धतीने अर्थात बैलजोड घेऊन चिखलणी, नांगरणी करून भात लागवड केली जाते.

नांगर धरणाऱ्यांना दिवसाला एक हजार रुपये, इतर पुरुष मजुरांना ५००, तर महिलांना ३०० ते ४०० रुपये मजुरी दिली जाते. यंदा पावसाचे प्रमाण चांगले असल्यामुळे शेतकरीवर्ग आनंदित झाला आहे.

### कृषी विभागाकडून आढावा

मुरूड तालुका कृषी कार्यालयाकडून प्रधानमंत्री पीक विमा योजनेविषयी गावोगावी जनजागृती करण्यात येत असून ग्रामपंचायत पातळीवर शेतकऱ्यांना पीक विमा अवघा एक रुपयात काढून घ्या, असे आवाहन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कृषी विभागाकडून शेतीतील राबांचे तसेच पाणी साचून कुजलेल्या भाताच्या लागवडीच्या नुकसानीची माहिती घेतली जात आहे. या वर्षी भाताचे पीक मोठ्या प्रमाणात येण्याची चिन्हे दिसून येत आहेत.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com